(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७, २२०२५३५४ (थेट)
फॅक्स : २२०२९३४८
ई-मेल पत्ता : msmjp7@gmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस/आस्था-४/ दि.२७/८/२००८.

विषय : दिनांक २६ ऑगस्ट-२००८ रोजी संपन्न झालेल्या
महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १११ व्या बैठकीचे इतिवृत्त.

दिनांक २६ ऑगस्ट-२००८ रोजी सकाळी ११.०० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १११ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यांत येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

सोबत : इतिवृत्त.

(संजय दहासहस्र)
सदस्य सचिव

मा.मंत्री.
पा.पु. व स्व.
तथा अध्यक्ष, म.जी.प्रा.



(महाराष्ट्र शासन उपक्रम)
पाणी हे जीवन आहे! पाण्याची बचत करा!

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, (दक्षिण कक्ष) बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३ / २७५७०१६६ / २७५७ ०३७० /
२७५७ १६७७, फॅक्स २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


जा.क्र.मजीप्रा/२००८/सभा-१११/६५/आ-४. दिनांक : १२.११.२००८

प्रति,

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सहअध्यक्ष,मंत्रालय, मुंबई-३२
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, (उर्जा ) उद्योग, उर्जा व कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१

**विषय :** मंगळवार दिनांक २६.८.२००८ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १११ व्या सभेचे इतिवृत्त..

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दिनांक २६.८.२००८ रोजी झालेल्या १११ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यात येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

आपली विश्वासू,

**( के.आर. मोरे )**
मुख्य प्रशासकीय अधिकारी

**सोबत :**१११व्या सभेचे इतिवृत्त

..२..

**प्रत,**

**वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.**

आपणास विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील **कार्यक्रम बाब क्र. ३ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ वर** सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ततेचा अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

**अधीक्षक अभियंता, (मुख्यालय), म.जी.प्रा. नवी मुंबई.**

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेल्या पुढील **कार्यक्रम बाब क्र. ६,७ व ८ वर** सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

उप मुख्य लेखा अधिकारी - १/२/, म.जी.प्रा., नवी मुंबई.

**आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. नवी मुंबई.**

आपणास सूचित करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधीत असलेली बाब क्र.**४,५ व पान क्र.१ परिच्छेद दोन मधील प्रस्तावित टिप्पणीवर** सत्वर कार्यवाही करुन कार्यपूर्ती अहवाल या शाखेकडे त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

प्रशासकिय-नि-आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

कक्ष / कार्यासन अधिकारी, आस्थापना-१/२/३/४/५/६/७.

कायदा व कामगार अधिकारी , म.जी.प्रा. नवी मुंबई यांच्या माहितीसाठी.

**वरील संबंधीत अधिका-यास विनंती करण्यांत येते की, आपल्या कक्षासंबंधी असलेल्या संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरीत कार्यवाही करुन कार्यपुर्ती अहवाल आ-४ शाखेकडे पाठवावेत.**

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १११ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १११ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २६.८.२००८ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.श्री.राजेश टोपे, राज्य मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष
३. श्री. अजित कुमार जैन, प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
४. श्री.मनुकुमार श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य
५. प्रधान सचिव, (वित्त व सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि.म. म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. प्रधान सचिव, (उर्जा ) उद्योग उर्जा कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.प्र.ना. मुदखेडकर, उप सचिव, (उर्जा) उर्जा विभाग मंत्रालय, मुंबई-३२
७. सचिव,ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री. अविनाश सुभेदार उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.**

१. श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
२. श्री. द. चि. सूर्यवंशी, प्रभारी मुख्य अभियंता, ठाणे तथा अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा., ठाणे
३. श्री.एम.जे. वडजकर, प्रभारी मुख्य अभियंता, औरंगाबाद तथा अ.अ. म.जी.प्रा., लातूर
४. श्री.बी.के.सवाई, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.
५. श्री. बा. शि. पाटील, उप-मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
६. श्री. के.आर.मोरे, कार्यकारी अभियंता तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी. म.जी.प्रा., मुंबई.

मा.मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली. बैठकीच्या सुरुवातीस मा.मंत्री तथा अध्यक्ष मजीप्रा यांनी नाशिक येथील म.जी.प्रा. मालकीच्या जागेचा **बांधा, वापरा व हस्तांतरीत करा** तत्वावर विकास करण्याचा मुद्दा उपस्थित केला असता मा.प्रधान सचिव यांनी याबाबत क्रिसील या संस्थेकडून अहवाल अभिप्रेत असल्याचे नमूद केले. याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मा.अध्यक्षांनी दिले असून सदर प्रस्तावामध्ये म.जी.प्रा. ची कार्यालये, कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने इत्यादींचाही समावेश राहील याची दक्षता घेण्यात यावी असे निर्देश दिले असता सदरचा प्रस्ताव सप्टेंबर २००८ अखेर सादर करण्यात येईल असे मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग यांनी संचालक मंडळास अवगत केले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११० व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २९ एप्रिल, २००८ रोजी संपन्न झालेल्या ११० व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११० व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २९ एप्रिल, २००८ रोजी संपन्न झालेल्या १०९ व्या बैठकीचे जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळात अवगत करण्यांत आल्यानंतर केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत..**

सदर कार्यक्रम बाबींमधील मुद्दांबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी बैठकीपुढे उहापोह केला. याबाबत मा.मंत्री महोदय तथा मजीप्रा अध्यक्ष यांनी व्याजाचे दर वाढले आहेत त्याचा गुंतवणूक करतांना विचार करावा मात्र राज्य शासनाच्या वित्त विभागाने मान्यता दिलेल्या बँकेमध्ये (राष्ट्रीयकृत बँक) गुंतवणूक करावी असे निर्देश दिले.

याबाबत चर्चा होऊन कार्यक्रम बाबीमध्ये प्रस्तावित केलेल्या दिनांक २५.३.२००८ ते १४.८.२००८ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यात येत आहे, तसेच मुदतपूर्व काढून घेण्यात आलेल्या गुंतवणुकीसही मान्यता देण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.४ : म.जी.प्रा. चे सन २००६-०७ चा प्रशासनिक वार्षिक अहवालास मान्यता देणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००६-०७ या सालाच्या वार्षिक अहवालाबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. याबाबत चर्चा होऊन सदरचा वार्षिक अहवाल विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात येऊन याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.५:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बळकटीकरणासाठी सध्याच्या प्रादेशिक मुख्य अभियंता संकल्पनेत बदल करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तसेच मा.सदस्य सचिव यांनी सदर संकल्पनेनुसार मुख्य अभियंता यांच्या अधिकार क्षेत्रात कोणते बदल राहतील याबाबत संचालक मंडळास अवगत केले.

सदर चर्चे दरम्यान प्रचलित संकल्पनेत बदल केल्याने, अधिकचा खर्च येणार आहे किंवा कसे याबाबत मा.मंत्री महोदय यांनी विचारणा केली असता, असा कोणताही जादा खर्च होणार नसून आहे याच मनुष्यबळातून असा बदल करण्याचे प्रस्तावित असल्याचे नमूद केले. सध्याच्या प्रादेशिक मुख्य अभियंता यांच्या मुख्यालयात बदल करुन सर्व मुख्य अभियंता यांना नवी मुंबई/ठाणे येथे एकत्र एकाच मुख्यालयाल ठेवावयाचे असून प्रत्येक मुख्य अभियंता यांना विशिष्ट कामाचे उद्दिष्ट द्यावयाचे आहे ही बाब मा.प्रधान सचिवांनी स्पष्ट केली. सद्यःस्थितीत एकाच मुख्य अभियंत्याकडे अनेक बाबींचे कामकाज असल्याने प्रत्येक बाबींकडे पूर्ण क्षमतेने लक्ष दिले जात नाही. उदा.- देखभाल व दुरुस्ती इत्यादी. या नवीन व्यवस्थेमुळे प्रत्येक मुख्य अभियंता त्यांना नेमून दिलेल्या बाबीकडे पूर्ण क्षमतेने लक्ष देऊ शकेल व त्यामुळे कामात गतिमानता येईल असे मा.प्रधान सचिवांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे ही व्यवस्था म.जी.प्रा. च्या पुनर्रचनेचा एक भाग म्हणून राहणार असल्याने भविष्यातील पुनर्रचनेच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल असेही नमूद करण्यात आले.

चर्चेअंती सादर केलेल्या वरील बाबीस संचालक मंडळाने मान्यता दिली असून याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.६ : आर्वी वाढीव पा.पु. योजना (जिल्हा-वर्धा) पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप (PPP) तत्वावर पूर्ण करणे व म.जी.प्रा.मार्फत देखभाल दुरुस्ती करणेबाबत.**

प्रगतीपथावर असलेली आर्वी शहराची पाणी पुरवठा योजनेची कामे कर्ज व लोकवर्गणीची रक्कम नगर परिषदेने उपलब्ध करुन न दिल्याने, स्थगित असून योजनेची ९०% कामे पूर्ण होऊनही योजनेवर झालेला रु.५.२३ कोटी खर्च अनुत्पादीत आहे. नगर परिषदेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता भविष्यांतही कर्ज व लोकवर्गणीची रक्कम नगर परिषदेकडून उपलब्ध होण्याची शक्यता नाही त्यामुळे सदर योजना प्राधिकरणाने ताब्यात घेऊन पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशीप (PPP) तत्वावर पूर्ण केल्यास व ही योजना म.जी.प्रा.ने ३० वर्षे खाजगी तत्वावर देखभाल दुरुस्ती केल्यास म.जी.प्रा. स ४ वर्षांनंतर प्रत्येक वर्षी रु.२.० कोटींचा नफा अपेक्षित असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

चर्चेअंती सादर केलेल्या या बाबीस संचालक मंडळाने मान्यता दिली असून याबाबत पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.७ : कोपरी जलतरंग येथील विश्रामगृहाचे दुरुस्ती करणे व नवीन प्रशासकीय इमारत, ठाणे येथे I.T. Cell विकसित करणे.**

म.जी.प्रा. अंतर्गत माहिती व तंत्रज्ञान प्रणालीचा वापर सक्षमपणे होण्याच्या दृष्टीने I.T.Cell विकसित करुन म.जी.प्रा. संपूर्ण माहिती एकत्रित होण्याच्या दृष्टीने गरजेचे असून या कक्षामधील अधिकारी/कर्मचाऱ्यांना बसण्यासाठी उपलब्ध करावयाच्या जागेत फर्निचर इत्यादींची उपलब्धता करणे. त्याचप्रमाणे कोपरी कॉलनी, ठाणे येथील म.जी.प्रा. च्या विश्रामगृहातील भिंतींना आलेला ओलावा बंद करणे व रंगरंगोटी इत्यादीसाठी एकूण रु. ४.६० लक्ष इतका खर्च अपेक्षित असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले..सद्य:स्थितीत कार्यक्रम बाबीव्दारे सादर केलेल्या प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

तथापि, अशा प्रकारच्या म.जी.प्रा. च्या ज्या-ज्या ठिकाणी स्वत:च्या जागा आहेत त्या जागा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर (BOT) विकसित केल्यास त्यापासून म.जी.प्रा.स फायदा होऊ शकेल ही बाब विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा यांनी दिले. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.८ : नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा सन २००८-०९ च्या कृती आराखड्यानुसार आढावा.**

म.जी.प्रा. शी निगडीत नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा सन २००८-०९ च्या कृती आराखड्यानुसार म.जी.प्रा. तर्फे सद्य:स्थिती करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत संचालक मंडळास सदर कार्यक्रम बाबीव्दारे अवगत करण्यात येत असल्याचे मा.प्रधान सचिव तसेच मा.सदस्य सचिव यांनी नमूद केले.

यामध्ये, विशेषत: नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्ज व लोकवर्गणीमधून कर्ज उपलब्ध करुन न दिल्यामुळे सदर योजना पूर्ण अथवा कार्यान्वित करता येत नाहीत. त्यामुळे अशा सर्व योजनांचा आढावा घेऊन ज्या योजना कार्यान्वित झाल्या आहेत मात्र कांही कामे अपूर्ण आहेत व भविष्यात निधी उपलब्ध होणार नाही त्या अंतिम करुन लेखा पूर्ण करणे, ज्या योजना अद्याप कार्यान्वित झालेल्या नाहीत त्यांसाठी आवश्यक कर्ज व लोकवर्गणी उपलब्ध करुन घेणे त्याचप्रमाणे ज्या योजनांवर शासकीय अनुदान उपलब्ध आहे व त्यांमधून किमान योजना कार्यान्वित करणे अथवा पूर्ण करणे प्रस्तावित असल्याचे संचालक मंडळास अवगत करण्यात आले. याबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश संचालक मंडळाने दिले. त्याचप्रमाणे ज्या योजना पूर्ण झालेल्या आहेत त्या योजनांचे लेखे १५ दिवसांच्या आंत पूर्ण करुन सदर योजना स्थानिक स्वराज्य संस्थानां हस्तांतरीत कराव्यात.

सदर चर्चे दरम्यान, मा.प्रधान सचिव, यांनी म.जी.प्रा. च्या संचालक मंडळामध्ये, सचिव (पर्यावरण),. महाराष्ट्र शासन यांचाही समावेश करावा अशी सुचना मांडली. त्यांस सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

(८)

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ : म.जी.प्रा. चे सन २००६-०७ चा वार्षिक लेखापरिक्षण अहवालास मंजूरीबाबत ..**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सन २००६-०७ या वर्षाचा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन संचालक मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सदर बाबींबद्दल वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी उहापोह केला.

लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील म.जी.प्रा. ने केलेले अनुपालन मान्यतेनंतर वार्षिक अहवालासह विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्यांत येणार असल्याने यास संचालक मंडळाची मान्यत प्रदान होणे आवश्यक असल्याचे नमूद केले. याबाबत चर्चा होऊन संचालक मंडळाने प्राधिकरणाचा सन २००६-०७ चा वार्षिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालनास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली असून सन २००६-०७ या वार्षिक लेखा व लेखा परिक्षण अहवाल राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याकरिता सदर अहवाल शासनाकडे पाठविण्यास संचालक मंडळाने संमती देण्यात आली आहे.या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

*************

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**